
**माहे डिसेंबर २०२२ महाचा मासिक अहवाल :-**
**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | माही डॉबरमॅन मेल | १) पोना/१२५५ एस.एस.सावतं<br>२) पोना/३७६ जी.के.जाधव | सावर्डे पो. स्टे. गु.र.नं. १०१/२०२२ भा.द.वि. कलम २९५ प्रमाणे हा गुन्हा दि. ०१/१२/२०२२ रोजी १७.३० ते दि.०२/१२/२०२२ रोजी ०५/३० गुन्हा घडला असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर मरीआई मंदीरात अज्ञात आरोपीने हाताळलेल्या अर्धवट जळालेल्या बांबूच्या काठीला भगव्या रंगाची कापडी निशानीचा वास श्वान माही यास दिला असता श्वान माही हा घटनास्थळावरून वास घेत मंदिरातील मुख्य दरवाजाने उत्तरेकडील दिशेने बाहेर पडुन सुमारे ५० मी. पुर्वेकडील दिशेने सावर्डे ते कुडूप असे जाणारे मूख्य डांबरी रस्त्याने सुमारे ३०० मीटर अंतरावर साई पार्क बिल्डींग येथे रस्त्याचे मधोमध पडलेल्या अर्धवट जळालेल्य मळकट रंगाच्या टि शर्ट ला तोंडात पकडुन खाली टाकून भुंकू लागला. सदर टि शर्ट चा वास श्वान माही यास दिला असता तो सावर्डे ते कुडप येथे जाणा-या डांबरी रस्त्याने सुमारे ३.६५० कि.मी. अंतीरवरील काजरकोंड वाडीत जावुन तेथे राहणारे सुनिल सखाराम सुर्वे यांचे घरात जावुन गोल गोल फिरून भुंकू लागला. सदर घरातील दिगंबर सुनिल सुर्वे या इसमास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे. त्यावरून तपासी अंमलदार यांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |


बॉम्ब शोध व नाश पथक
रत्नागिरी

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | पुणे शहर | जॅक डॉबरमॅन मेल | १) पोशि/९९९२ खरांदे<br>२) पाशि/ १४३३ नाळे | दत्तवाडी पो. स्टे. गु.र.नं. २३२/२०२२ भा.द.वि. कलम ३०२,३४, आर्म अॅक्ट ४(२५), म.पो.का. ३७(१), १३५ प्रमाणे हा गुन्हा दि. ०८/१०/२०२२ रोजी १४.१८ वा. दाखल असून गुन्हयाचे घटनास्थळी सापडलेल्या ३ चपलांचे जोडांचे वास देवुन पोलीस चौकी येथे उपस्थित असणा-या संशयितांची ओळख परेड करावयास सांगितले. घटनास्थळी तीन चपलांचे जोड मिळाल्याने त्यांपैकी पांढ-या रंगाच्या रबरी चप्पलचा श्वान जॅक यास वास देवुन ०६ संशयित इसम नामे १. संतोष चिंचोलकर, २. कृष्णा माने, ३. शुभम लगट, ४. अनिकेत बाळू नागरे, ५. कुणाल बळवंत मोरे, ६. आदित्य संजय जोरी यांचेपैकी आरोपीस शोधण्याकरीता फाइंड आऊड असा आदेश दिला असता त्याने ०६ आरोपींपैंकी आरोपी क्रं. ४ अनिकेत बाळू नागरे याचेवर भुंकून इशारा दिला.<br>तसेच वरीलप्रमाणे श्वान जॅक यास पुन्हा काळया रंगाच्या चामडयाच्या चप्पलचा वास दिला असता त्याने वरील नमुद आरोपींपैकी आरोपी अनिकेत बाळू नागरे यांच्यासमोर जाऊन बसुन त्याचेकडे भुंकून इशारा दिला. इसम नामे विनोद वामन आल्हाट यांच्यासमोर जाऊन बसुन त्याचेकडे भुंकून इशारा दिला. तसेच श्वान जॅक यास पुन्हा पांढ-या रंगाच्या चप्पलचा ज्यास लाल रंगाच्या पटया असलेली वास दिला असता त्याने वरील नमुद आरोपींपैकी आरोपी आकाश संतोष देवरूखे यांच्यासमोर जाऊन बसुन त्याचेकडे भुंकून इशारा दिला. तसेच सदर इसमांची पुन्हा आदलाबदली करून उभे करून पुन्हा श्वानास फाइंड आऊट असा आदेश दिला असता त्याने पुन्हा संशयिताकडे पाहून भुंकून इशारा दिला. नमुद ओळखपरेड नुसार आरोपी निष्पन्न झाला आहे. त्यावरून तपासी अंमलदार यांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |




| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३. | औरंगाबाद ग्रामीण | खुशी डॉबरमन फिमेल | १) सपोफौ/८९५ तळेकर<br>२) पाहवा/५५ व्यवहारे | वैजापूर पो. स्टे. गु.र.नं. ४९३/२०२२ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे हा गुन्हा दि. ०९/१२/२०२२ रोजी ०४.१० वा. चे पुर्वी (वेळ नक्की नाही) दाखल असून मधील संशयीत गुन्हेगार यांना ईतर ३ ते ४ लोकांनमध्ये सर्वांना काळे मास्क घालून उभे करून घटनास्थळावर सापडलेल्या काठीचा वास श्वान खुशीस देवुन ओळखपरेड घेतली असता श्वान खुशीने एका इसमास भुंकून ओळखून दाखविले. सदर इसमास त्याचे नाव, गाव विचारले असता सदर इसमाने आपले नाव अजय दिपक पगारे, वय २२ वर्षे, रा. म्हस्की, चौफुली, लाडगाव रोड, वैजापुर असे सांगितले. नमुद ओळखपरेड नुसार आरोपी निष्पन्न झाला आहे. त्यावरून तपासी अंमलदार यांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४. | अकोला | जोया डॉबरमन फिमेल | १) पोहवा/४९९ गायकवाड<br>२) पोशि/२२५७ आहिर | पिंजर पो. स्टे. गु.र.नं. ३२२/२०२२ भा.द.वि. कलम ४६१, ३८० प्रमाणे हा गुन्हा दि.१७/१२/२०२२ रोजी १५.०१ वा. दाखल असुन श्वान जोया ही घटनास्थळावर मिळालेल्या ॲल्युमिनीअमची खलबत्त्याचे तुटलेल्या दांडयांचा वास श्वान जोया हीस दिला असता ती सेंट्रल बँक, राम मंदीर चौक, जामा मस्जीद तेथून उजवीकडे वळून वंजारीपुरा चौक येथे गोल फिरून थांबली पुन्हा वास दिला असता ती पिंजर गावातील एका घरासमोर जावुन फिरून घुटमळून थांबली. सदर घरातील संशयीत दोन इसमांना तपासी अधिकारी यांनी ताब्यात घेवून पो.स्टे. ला आणून घटणास्थळावर मिळालेल्या मुसळचा परत श्वान जोयास वास दिला असता तीने त्यातील एका इसमाचे अंगावर पाय टाकून ओळखलेवरून त्यावरून तपासी अंमलदार यांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५. | अकोला | जोया डॉबरमन फिमेल | १) पोहवा/४९९ गायकवाड<br>२) पोशि/२२५७ आहिर | पिंजर पो. स्टे. गु.र.नं. ३२६/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे हा गुन्हा दि.२६/१२/२०२२ रोजी १७.१४ वा. दाखल असुन श्वान जोया ही घटनास्थळावरील दानपेटीच्या तुटलेल्या कुलुपाचा वास दिला असता ती मार्ग काढत वाघागड गावात येवून एका घरात घुसून थांबत आहे. परत परत सदर कुलूपाचा वास दिला असता त्याच घरात घुसून थांबत आहे. त्यावरून तपासी अंमलदार यांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६. | भंडारा | रॉकी डॉबरमन मेल | १)पो.हवा.७२१ कोरे<br>२)पो.ना./१२४५ निंबार्ते | पालंदूर पो. स्टे. गु.र.नं. १६४/२०२२ भा.द.वि.कलम ३०२ प्रमाणे हा गुन्हा दि. ०७/१२/२०२२ रोजी १७.५७ वा. दाखल असुन घटनास्थळावरील दांडयासह कुऱ्हाडीचा वास श्वान रॉकी यास दिला असता श्वान रॉकी हा रोडच्या बाजूला लागुन असलेल्या शेताच्या बांधामधुन वास घेत घेत २०० मीटर जावून डावीकडे वळून झरपते कोलारा रोडवर जावून उजवीकडे वळून रोडने वास घेत घेत जावून डावीकडे वळुन शेताच्या बांधवरून वास घेत घेत उजवीकडे वळून सिमेंट रोडने सुरेश उदाराम भोयर यांचे घरी जावून घरात फिरून बाहेर निघुन गुरांच्या गोठयात जावुन भुंकून थांबला. त्यावरून तपासी अंमलदार यांनी तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



अशा प्रकारे माहे डिसेंबर २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत खून -३, घरफोडी - १, चोरी - २ असे एकुण - ६ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.